|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. २४ सप्टेंबर: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्रविद्यापीठातील आरोग्य केंद्र व गुजराथी आयुर्वेद संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी 'आरोग्यमय उद्यासाठी आयुर्वेद' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठ आरोग्य केंद्रात मोफत आरोग्य तपासणी व धन्वंतरीचे दीप प्रज्वलन कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांचे हस्ते करण्यात आले.

पर्यावरणशास्त्र प्रशाळेत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुर्वेद गुरूवैद्य नरेंद्र गुजराथी, वैद्य रोहीत गुजराथी, जैवशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. भुषण चौधरी, प्रा. दिपक दलाल, प्रा. संजय अत्तरदे, इंजि. आर.आय. पाटील इतर मान्यवर उपस्थित होते.

आयुर्वेद गुरूवैद्य नरेंद्र गुजराथी यांनी भविष्यात आयुर्वेदाचे महत्व पटवून सांगितले. या आरोग्य शिबीरात ३८ रूग्णांची तपासणी करण्यात येवून त्यांना मार्गदर्शन व औषधोपचार दिलेत. या कार्यशाळेसाठी प्रशाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सारंग खाचणे, डॉ. रोशनी पाटील व आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मदत केली.

**बातमी क्र. २**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. २४ सप्टेंबर: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असलेल्या बौध्दीक संपदा हक्क विभाग (आयपीआर सेल) व रासायनिक शास्त्र प्रशाळेच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'कॉपीराईट' याविषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी १०.०० वाजता करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेच्या उद्‌घाटनाला भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाचे निबंधक तथा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. दिनेश पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यशाळेसाठी राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ उपस्थित राहणार असून कॉपीराईट कसे घ्यावे, कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर, कॉपीराईट उल्लंघनाचे परिणाम, या क्षेत्रामध्ये करीअर संधी इ.विषयावर सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

तरी समाजातील सर्व स्तरावरील विद्यार्थी, शिक्षक, संशोधक इच्छुक सामान्य नागरिकांनी नोंदणी करण्यासाठी परिषदेचे सचिव डॉ. सारंग बारी (8999591662) किंवा समन्वयक मयुर पाटील (8788642216) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष प्रा. दिपक दलाल व निमंत्रक प्रा.विकास गीते यांनी केले आहे.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. २४ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता